### आगामी योजना : नजीकच्या भविष्यकाळात...

- विविध विषयांकरिता हिवाळी आणि उन्हाळी संस्कार शिबिरे घेण्यासाठी आवश्यक अशा सुविधा पुरविणे.
- बी. सी. ए. महाविद्यालय व पदविका अभ्यासक्रम.
- बालगृहातील मुलींना आजी-आजोबांच्या सहवासासाठी आणि वृध्दांना निवाऱ्यासाठी तसेच नातवंडांच्या सहवासासाठी 'स्नेहसदन',जेष्ठ नागरीक निवास.
- पुण्यामध्ये काम करणाऱ्या स्त्रीयांसाठी वसतीगृह,वृध्दांसाठी सांस्कृतीक केंद्र व लहान मुलांसाठी बालभवन उभारायचा संस्थेचा मानस आहे.
- उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी अभ्यासवर्ग.
- इंग्रजी माध्यम पूर्वप्राथमिक शाळा.(वाघोली येथे)

### ✲ नम्र आवाहन ✲

**पैसा हे जरी सर्वस्व नसले तरी ह्या साऱ्यासाठी पैशाची गरज असते आणि ती गरज विविध दानशूर व्यक्ती आणि संस्था भागवितात. म्हणूनच एवढा मोठा महारथ आम्ही समर्थपणे ओढतो आहोत. आपलेही यात यथाशक्ती योगदान व्हावे ही नम्र अपेक्षा.**

### आपण संस्थेस असे सहाय्य करू शकाल

- बालसदन साठी ₹ ४००० प्रति मुलामागे प्रतिमहिना (एकूण ३० लाभार्थी).
- ग्रामिण भागातील बालवाड्यांचे पालकत्व
- बालगृहातील मुलींसाठी महाविद्यालयीन शिक्षण, अभ्यासक्रमासाठी अर्थसहाय्य
- महाविद्यालय इमारत उभारणीसाठी/निर्मितीसाठी अर्थसहाय्य फुलगाव
- पुणे येथे गरजू नोकरदार महिलांसाठी हॉस्टेल, बालभवन व ज्येष्ठ नागरिकांसाठी मनोरंजन केंद्र.



**कृपया आपली मदत 'इन्व्हेस्टमेंट इन मॅन' या नावे द्यावी.**

संस्थेला ८० जी प्रमाणपत्र आहे. त्यामुळे आपल्या देणगीबाबत करसवलत मिळेल. सेक्शन ८० जी ऑफ आय.टी.ॲक्ट ऑफ १९६१ बाय ऑर्डर ऑफ द कमिश्नर ऑफ इनकम टॅक्स, पुणा. नं.पी एन/सी आय टी-आय/१२ए (ए)८०जी/३७५/२००७-०८/६७४८ डेट.०१/०४/०७.

**FCRA No. 083930074** **पॅन नं. AAATI057L**


### विश्वस्त मंडळ

श्रीमती आशा शेठ- अध्यक्षा
डॉ. चारूदत्त आपटे
श्री. सुधाकर मराठे- विश्वस्त-सचिव
श्रीमती वंदना शेठ
श्री. प्रवीण लुंकड
श्री. यतीन शहा
श्री. आनंद नांदगावकर

### सल्लागार मंडळ

श्री. अभिजीत बोरा
श्री. मंदार पूर्णपात्रे
श्री. नरेंद्र पानसे
श्री. नीरज दोशी
श्रीमती अर्चना जोशी






## इन्व्हेस्टमेंट इन मॅन ट्रस्ट

राही-सखा अपार्टमेंट, फ्लॅट नं. १५-१६,
४ था मजला, एफ पी नं. ५८८ ए,
चैतन्य हॉस्पिटलच्या वर, सिंहगड रोड,
पर्वती, पुणे ४११०३०
फोन +९१-०२०-२४३२५१०८,

फुलगाव कॅम्पस-ज्ञानेश बालसदन,
मु. पो. फुलगाव, ता. हवेली,
जि. पुणे ४१२२१६ (भारत)
बालसदन ७७९८८३३२१७
ईश्वरी ७७९८८३३२१६

**ई-मेल : investmentinman.pune.india@gmail.com**
**वेब : www.iimtrust.org**





# इन्व्हेस्टमेंट इन मॅन ट्रस्ट
(IIM Trust)

सार्वजनिक ट्रस्ट क्र. ई - ४३२ (पुणे)
ग्रामीण विकासार्थ स्वयंसेवी संस्था
पुणे, महाराष्ट्र, भारत



# इन्व्हेस्टमेंट इन मॅन ट्रस्ट

**चिंतन मनुष्य घडणीचे :**

आज माणसात 'माझ्यासारखा कोणी नाही' असा अहंकार तरी आहे किंवा 'माझ्यात काही अर्थ नाही', 'माझे जीवन व्यर्थ आहे', असा निराशावाद आहे. हे दोन्ही विचार अयोग्य आहेत. बालपणापासूनच मनुष्य घडणीचे संस्कार करून नराचा नारायण बनण्याचे कामी काही खास योजना करणे, त्यासाठीच माणूसकीत गुंतवणूक करणे आवश्यक आहे. हे जीवनाचे ध्येय मानून पैशापेक्षा 'माणूस' निर्माणाचे कामात गुंतवणूक करण्याचे काही लोकांनी ठरविले. त्यातूनच '२५ फेब्रुवारी १९७०' रोजी 'इन्व्हेस्टमेंट इन मॅन' नावाचा ट्रस्ट स्थापन करण्यात आला. कै.डॉ.अच्युत शंकर आपटे,कै.डॉ.उपेंद्र शंकर आपटे,कै.फादर मॅथ्यू लेदर्ले, कै. श्रीमती मिनाक्षीताई आपटे, हे या ट्रस्टचे संस्थापक सदस्य. पुढे कै. डी. एम. शेठ, श्रीमती आशाताई शेठ आणि श्री. सुधाकर मराठे यांच्या समर्थ योगदानाने हा ट्रस्ट गेली ४४ वर्षे अव्याहतपणे विविध उपक्रम करीत विस्तारित होताना दिसत आहे.

मुख्यत: महाराष्ट्रातील पुणे जिल्हा आणि विशेषत्वाने ग्रामीण भागातील लोकांचा सर्वांगीण विकास, हे उद्दिष्ट धरून कामाला सुरूवात झाली. ह्या साऱ्यात मुले व महिलांचे शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग व्यवसाय आणि त्याच्या आधारावर ग्रामीण भागातील समाज, स्वत:च्या पायावर समर्थपणे उभा करण्याचे स्वप्न, या सर्वांनी प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला. ह्या साठी पुणे जिल्ह्यातील नगर रोड परिसरातील हवेली तालुक्यातील, फुलगाव, वाघोली, तळेगाव ढमढेरे तर शिरूर तालुक्यातील करडे आणि कारेगाव येथे काम सुरू झाले.

**उद्दिष्टे :**

एवढ्या मोठ्या कामासाठी काही ठळक उद्दिष्टे ठरविली गेली. ज्यामुळे कार्यक्रम, उपक्रमाची दिशा निश्चित झाली. ती उद्दिष्टे:

- ✲ निराधार मुलांचा सांभाळ करून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याइतके समर्थ करणे.
- ✲ अतिमागास आणि अविकसित भागातील मुला मुलींच्या शिक्षणाची सोय करणे शिवाय जी मुले नेहमीचे औपचारिक शिक्षण घेण्यास असमर्थ आहेत त्यांच्यासाठी सुध्दा वेगळी व्यवस्था करणे.
- ✲ अशाच प्रकारचे काम करणाऱ्या अन्य संस्थांना व व्यक्तींना मदत करणे किंवा त्यांचे सहकार्य घेणे.
- ✲ खेड्यातील आर्थिक उत्पादन वाढीसाठी पुढाकार घेऊन कार्यक्रम आखणे आणि त्याचा पाठपुरावा करणे.
- ✲ या सर्व कल्याणाच्या कार्यक्रमाशी उमेदीच्या आणि उत्साही तरूण कार्यकर्त्यांना जोडणे.

**ट्रस्टने सुरू केलेले प्रकल्प**

- निराधार किंवा अल्पाधार मुलींसाठी बालगृह (बालसदन).
- 'ईश्वरी' महिला प्रशिक्षण केंद्र.
- 'अंगणवाडी' चालविणाऱ्या सेविकांचे व मदतनीसांचे सेवांतर्गत प्रशिक्षण केंद्र.
- शालापूर्व शिक्षण संस्कारासाठी बालवाड्या.
- शिक्षक प्रशिक्षण, उच्च शिक्षण व संगणक प्रशिक्षण केंद्र.
- कृषी संबंधीचे कार्यक्रम

**बालगृह (बालसदन) :**



ज्ञानेश, निवृत्ती, नामदेव, मुक्ताई, आभाळमाया अशा विविध घरात प्रत्येकी सुमारे ५ -६ मुले आणि सदनमाता अशी रचना करून त्या मुलामुलींचे संगोपन केले जाते. (२०१४ ह्या वर्षापासून फक्त मुलींसाठीच ही सुविधा उपलब्ध आहे.) एकूण ३० मुलींची व्यवस्था आहे. ह्यात जरी शासन नियमाप्रमाणे ६ ते १८ एवढ्या कालावधीसाठी ही व्यवस्था असली तरी मुलीच्या विवाहापर्यंत सर्व काळजी ट्रस्ट घेते. निवासी पूर्णवेळ गृहमाता, पूर्णवेळ व्यवस्थापिका यांचा संपूर्ण खर्च ट्रस्टमार्फत होतो.

**ईश्वरी (महिला प्रशिक्षण केंद्र ) :**

**(इन्स्टिट्युशन फॉर द सर्व्हिसेस् ऑफ हॅण्डीक्राफ्ट्स् ॲण्ड वुमेन्स् अवेअरनेस ऑफ रूरल इनिशिएटिव्हज)**



कमी शिकलेल्या अगर न शिकलेल्या महिलांच्या सबलीकरणासाठी ९ ते १० महिन्यांचा एक अभ्यासक्रम तयार केला आहे. त्यात व्यक्तीमत्व विकास,शिवणकाम, भरतकाम, वीणकाम, भेटकार्ड निर्मिती या सारख्या विषयांबरोबरच खाद्य पदार्थ निर्मितीचे शिक्षण दिले जाते व त्यातून नियमित रोजगार उपलब्ध होतो. या शिक्षणासाठीची व्यवस्था व महिलांसाठी निवासाची सोय संस्थेने विनामूल्य उपलब्ध केली आहे. यात'कमवा व शिका'हे तत्व अंगीकारले आहे.

**अंगणवाडी कार्यकर्ती प्रशिक्षण केंद्र :**

महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग या अंतर्गत हे प्रशिक्षण केंद्र १९८३ पासून सुरू आहे. अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना निवास व भोजन व्यवस्थेसह पायाभूत एक महिना व उजळणी प्रशिक्षण एक आठवडा असे सेवांतर्गत प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणाच्या काळात त्यांना

✲ एकात्मिक बाल विकास योजनेची ओळख ✲ आहार व आरोग्य
✲ अनौपचारिक पूर्व प्राथमिक शिक्षण
✲ सामाजिक संबंध व सुसंवाद
✲ अंगणवाडीचे व्यवस्थापन
✲ बचत गट महत्व व कार्य इत्यादी

विषयाचे अध्यापन केले जाते



**बालवाड्या :**



वाघोली, तळेगाव, करडे आणि कारेगाव या चार गावात मिळून दर वर्षी सुमारे ६०० मुला मुलींची बालवाडी शिक्षणाची सोय केली आहे. शिक्षिका स्थानिक आहेत. त्यांना प्रशिक्षण देऊन गावातच रोजगार उपलब्ध करून दिला. वाघोली येथे या वर्षापासून इंग्रजी माध्यमाची बालवाडी प्रायोगीक स्वरुपात सुरु केली आहे.

**शिक्षक प्रशिक्षण :**

परिसरातील पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांना अधिक समर्थ बनविण्यासाठी तज्ज्ञ, अनुभवी प्रशिक्षकांकडून सेवांतर्गत प्रशिक्षण देण्यात येते.

**उच्च शिक्षण व संगणक प्रशिक्षण केंद्र:**

आधुनिक तंत्रज्ञानात ग्रामीण भागातील विद्यार्थी मागे राहू नये म्हणून 'चैतन्य सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजीज्'चे मदतीने ट्रस्टने नि:शुल्क संगणक प्रशिक्षण केंद्र सुरू केले आहे. यामधील प्रवेशासाठी कोणतीही वयाची अट नसून कोणालाही त्याच्या आवडीनुसार हे शिक्षण घेता येते. यात संगणक प्रशिक्षण हे पदवी किंवा पदविका करीता करण्याचा ट्रस्टचा मानस आहे.



**कृषी संबंधीचे कार्यक्रम :**



संस्थेकडे साडेपाच हेक्टर शेतजमीन असून सदरच्या जमीनीसाठी पुरेसा पाणी पुरवठाही आहे. सध्या संस्थेच्या जागेत सीताफळ, पेरू, चिंच, आंबा व लिंबाची झाडे लावली आहेत. सदरची शेत जमीन हे वेगवेगळे शेतीचे प्रयोग करणे व कृषि पर्यटन यासाठी वापरली जावी असा संस्थेचा मानस आहे.

## FUTURE INITIATIVES

- Safe and proper infrastructure development for the educational and personality development camps and workshops for different age groups.
- Post Graduate degrees and Diploma courses in computer science at Phulgaon campus.
- Construct and run 'Snehsadan', old age home.
- Plan for construction of working women hostel. entertainment hall for senior citizens and Balbhavan for children in Pune.
- Coaching classes for high school students in areas around Phulgaon.

## AN APPEAL FOR HELP

**We all know that money is not the only thing but it is required to run the activities of the trust. This help comes from various individuals and institute which supports us in continuing these activities. Your support in cash or kind is welcome.**

- Help for Balgruh- ₹ 4000/-per child per month-total 30 children.
- Sponsorship for rural areas' Balwadi.
- Sponsorship for higher education of girls from Balgruh.
- Help in developing higher education facilities at Phulgaon campus.
- Help for construction of a working women hostel.
- Balbhavan and cultural centre at Pune.



**Please note that donation to be made in the name of INVESTMENT IN MAN.**

All donations get income tax deduction under Section 80-G of I.T. Act of 1961by order of Commissioner of Income Tax, Poona No. Pn/CIT-I/12A (a) 80G/375/2007-08/6748 dt-01/04/07.

**FCRA No. 083930074** **PAN No.AAATI057L**


## BOARD OF TRUSTEES

Smt. Asha Sheth-Chairperson
Shri. Sudhakar Marathe-Secretary
Shri. Pravin Lunkad
Dr. Charudatta Apte
Smt. Vandana Sheth
Shri. Yatin Shah
Shri. Anand Nandgaonkar

## ADVISORY COMMITTEE

Shri. Abhijeet Bora
Shri. Narendra Panse
Shri. Mandar Purnapatre
Shri. Neeraj Doshi
Smt. Archana Joshi





## Investment In Man Trust


Rahi-Skha Apts,4th Floor, Flat No.15-16,
F.P.No. 588 A , Above Chaitanya Hospital,
Sinhagad Road, Parvati,
Pune 411030, INDIA
Phone:+91-020-24325108.

Phulgaon Campus-Dnyanesh Balsadan
Pulgaon, Tal.Haveli
Dist. Pune 412216, INDIA
Balsadan : 7798833217
Ishwari : 7798833216

**Email : investmentinman.pune.india@gmail.com**
**Web : www.iimtrust.org**




# Investment In Man Trust

(IIM Trust)

Public Charitable Trust No.E-432 (Poona)
Voluntary Association for Rural Development
Pune, Maharashtra, India



# Investment In Man Trust

Investment in Man Trust (IIM Trust) was established on 25th February 1970. Late Dr. Upendra Apte, Late Dr.Achut S. Apte, Late Fr. Mathew Lederle and Late Smt. Meenaxitai Apte were the founder members of the trust. Further Late Shri. D.M. Sheth, Smt. Ashatai Sheth and Shri. Sudhakar Marathe joined for the support of the trust. IIM Trust has been working for the last four decades, in the field of child and woman welfare and rural development in areas near Pune, Maharashtra. IIM Trust is known for its institutional learning and social services. The major problem, faced by our country, is development of rural communities along with occupations, education, health and family welfare. Our experience shows it is necessary to work in close co-operation with rural communities. The IIM Trust had chosen village Phulgaon, fourty kilometres away from Pune on Pune-Ahmednagar highway (SH 60 ) as its base for all the activities.

**OBJECTIVES:**

- Take care of destitute children and support them to make them independent and help them to get the good education and the jobs.
- To provide education to children in remote rural areas near Pune and also to the special children who are unfit for formal education.
- Involve young men, women and institutes from different walks of life in welfare activities.
- To co-operate with other institutions working towards similar goals.
- To initiate and pursue programmes of economic development and welfare activities for rural areas.

### IIM Trust Projects:

- Homes for destitute children (Dnynesh Balgruh).
- "ISHWARI"education and Development Centre for Women.
- "Anganwadi Workers" Training Centre.
- Pre-primary Schools (Balwadies) and Teachers' Training Centre.
- Higher Education and Computer Learning Centre.
- Agricultural activities.

### HOMES FOR DESTITUTE CHILDREN (DNYANESH BALGRUH) :

The rural settings of IIM Trust's project is ideally suited for care and help of destitute children. Five suitable homes have been constructed for these children. Each home accommodates maximum 5-6 children under the care of house mother. In all thirty children, mainly girls, of different age groups with four house mothers are the occupants who benefit from this facility. Here the children are accommodated between the ages 6 to 18 years.



### ISHWARI CENTRE FOR WOMEN :

(Institute for the Service of Handicrafts and Women's Awareness of Rural Initiatives)



The main objective of this program is to help economically deprived and physically challenged women to become aware of their potential and dignity. This program commenced from 1990,which includes theory and practice in making handicrafts, embroidery, tailoring, bakery products and catering. This is sandwich course of approximately ten months. IIM Trust provides necessary facilities and free accommodation to the trainees. It is more of 'Earn and Learn' process.

### ANGANWADI WORKERS' TRAINING CENTRE :

This is being conducted since 1983,on behalf of Integrated Child Development Scheme (ICDS), New Delhi. This is an on job refresher training for Anganwadi Workers. The main objectives are to train village Anganwadi Workers in following areas :



✻ Orientation of ICDS Schemes, ✻ Nutrition, ✻ Health, ✻ Pre-primary education and child development, ✻ Management of small scale organization, ✻ Family planning and birth control, ✻ Community contacts and participation, ✻ Parent and community education.

### PRE-PRIMARY SCHOOLS (BALWADIES) AND TEACHER'S TRAINING CENTRE :

Villages in IIM Trust project area have primary schools run by district authorities. No government program recognizes and provides any support for pre-primary education. Keeping in mind, IIM Trust has undertaken to run 16 pre-primary schools (Balwadies). This activity is in operation for more than three decades on Pune-Nagar highway and surrounding village areas. More than 600 children benefitted every year through this activity. This year we have started English medium pre-primary education on experimental basis at Wagholi.



### TEACHER'S TRAINING :

The major obstacle was availability of trained teachers in rural areas. To overcome this difficulty, IIM Trust conducts Teachers' Training Centre from time to time. The trained teachers of kindergarten benefit from this continuous training process and thus they do not have to travel long distance for their employment. This helps them to perform a vital function in their respective villages.

### HIGHER EDUCATION AND COMPUTER LEARNING CENTRE:

In view of training and making aware rural students in computer technology, which is need of the day, with the help of Chaitanya Software Technologies ,IIM trust is providing free of cost computer training to all village people, regardless of age. We wish to expand this as a higher education up to graduation/diploma in this field. For the benefit of rural students an ultra modern facility is developed at our project site in Phulgaon.



### AGRICULTURE :



The trust owns 5.5 hectares of land with adequate irrigation facility for the entire farm. At present we have got plantations of anona, guava, mango, tamarind and citrus lime trees. We wish to use this farm as an experimental farm to conduct various experiments on plant production and there is plan of agro-tourism.